# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **22/12/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मानोरा येथे 35 लाख रुपयाची सोयाबीनसह ट्रॅक विश्वासघात करून पळून घेऊन गेल्या बाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. ठाणेदार श्री सुनील जाधव व त्यांचे पथकाने 35 लाखाच्या मुद्देमालासह दोन आरोपीस ताब्यात घेऊन केली धडाकेबाज कारवाही.

## मानोरा पोलीसांची धडक कारवाई

## ३५ लाखाच्या सोयाबीन चोरट्यांना केले शिताफीने जेरबंद !



**प्रतिनिधी / वाशीम**

पोलीस स्टेशन मानोरा येथे अपराध नं.७९७/२०२१ कलम ४०६, ३४ भादंवि चा गुन्हा दाखल झालेला असून फिर्यादी गोपाल राधेश्याम हेडा, वय ५० वर्षे, व्यवसाय-धान्य व्यापार, रा.दिग्रस रोड, रामदेव नगर, मानोरा यांनी दि.०८.१२.२०२१ रोजी तिरुपती ट्रान्सपोर्ट कंपनीचा १४ चाकी ट्रक क्र.CG१०AQ६०४० मध्ये ३०३ क्विंटल सोयाबीन अंदाजे किंमत २१४०६२४/- रुपयांचा माल फिर्यादीने हमालामार्फात भरून मानोरा येथून जयसिंगपूर सांगली येथे पाठविला होता. परंतु ट्रक वरील चालक नामे १) ईश्वरसिंह बापुलाल सौधिया, वय - २४ वर्षे, २) नारायणसिंह बिरमसिंह सौधिया, वय - ३५ वर्षे दोन्ही रा.खिलचीपूर, ता. खिलचीपूर, जि.राजगड, राज्य - मध्यप्रदेश यांनी फिर्यादीचा विश्वासघात करून ट्रक क्र.CG१०AQ६०४० व ट्रकमधील ३०३ क्विंटल सोयाबीन घेऊन गेले.

सदर गुन्ह्यामध्ये मा.पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.अपर पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब, कारंजा यांचे मार्गदर्शनाखाली मा.पोलीस निरीक्षक श्री.सुनील जाधव यांच्या आदेशाने सहा.पोलीस निरीक्षक महेश पुचेकर यांनी सदर गुन्ह्याचे तपासात गुप्त बातमीदार व तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे माहिती प्राप्त करून पोलीस स्टेशन मानोरा येथून पोहेकॉ./६२० संदीप बरडे, पोकॉ./४०८ शकील मुन्नीवाले, पोकॉ./१४२४ पंकज खाडे यांना पोलीस ठाणे खिलचीपूर, जिल्हा-राजगड, राज्य-मध्यप्रदेश येथे रवाना करून गुन्ह्यातील ट्रक क्र.एड१०AQ६०४० अंदाजे किंमत १५ लाख रुपये व ३०३ क्विंटल सोयाबीन किंमत २१४०६२४/-रुपये असा एकूण ३६,४६,६२४/- रुपयांचा मुद्देमाल खिलचीपूर येथून ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन मानोरा येथे परत आले. वरील आरोपितांना पोलीस स्टेशनला अटक करून मा.प्रथम वर्ग न्यायालय, मानोरा यांच्याकडून दि.२४ डिसेंबर २०२१ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळाला आहे. पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक महेश कुचेकर करीत आहेत.

याजनच कायक्रम आधकारा कायक्रमाच सचालन प्रा डा मगल इ ना विशष पारश्रम घतल धतावर वयात्तक पात्र लाभाथा घर/झापडा/पालामध्य राहणार

## मानोरा पोलीसांची धडक कारवाई

## ३५ लाखाच्या सोयाबीन चोरट्यांना केले शिताफीने जेरबंद.



**मानोरा/प्रतिनिधी–**

दिनांक १६.१२.२०२१ रोजी पोलीस स्टेशन मानोरा येथे अपराध नं.७९७/२०२१ कलम ४०६, ३४ भादंवि चा गुन्हा दाखल झालेला असून फिर्यादी गोपाल राधेश्याम हेडा, वय ५० वर्षे, व्यवसाय धान्य व्यापार, रा.दिग्रस रोड, रामदेव नगर, मानोरा यांनी दि.०८.१२.२०२१ रोजी तिरुपती ट्रान्सपोर्ट कंपनीचा १४ चाकी ट्रक क्र.उत्र१०ट६०४० मध्ये ३०३ क्विंटल सोयाबीन अंदाजे किंमत २१४०६२४/- रुपयांचा माल फिर्यादीने हमालामार्फात भरून मानोरा येथून जयसिंगपूर सांगली येथे पाठविला होता. परंतु ट्रक वरील चालक नामे १) ईश्वरसिंह बापुलाल सौधिया, वय २४ वर्षे, २) नारायणसिंह बिरमसिंह सौधिया, वय ३५ वर्षे दोन्ही रा.खिलचीपूर, ता. खिलचीपूर, जि.राजगड, राज्य मध्यप्रदेश यांनी फिर्यादीचा विश्वासघात करून ट्रक क्र.CG१0Q६0४0 व ट्रकमधील ३0३ क्विंटल सोयाबीन घेऊन गेले.

सदर गुन्ह्यामध्ये मा.पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.अपर पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब, कारंजा यांचे मार्गदर्शनाखाली मा.पोलीस निरीक्षक श्री.सुनील जाधव यांच्या आदेशाने सहा.पोलीस निरीक्षक महेश पुचेकर यांनी सदर गुन्ह्याचे तपासात गुप्त बातमीदार व तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे माहिती प्राप्त करून पोलीस स्टेशन मानोरा येथून पोहेकॉ./ ६२० संदीप बरडे, पोकॉ./४०८ शकील मुन्नीवाले, पोकॉ./१४२४ पंकज खाडे यांना पोलीस ठाणे खिलचीपूर, जिल्हा- राजगड, राज्य-मध्य प्रदेश येथे रवाना करून गुन्ह्यातील ट्रक क्र.उत्र१०ट६०४० अंदाजे किंमत १५ लाख रुपये व ३०३ क्विंटल सोयाबीन किंमत २१४०६२४/- रुपये असा एकूण ३६,४६,६२४/- रुपयांचा मुद्देमाल खिलचीपूर येथून ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन मानोरा येथे परत आले. वरील आरोपितांना पोलीस स्टेशनला अटक करून मा.प्रथम वर्ग न्यायालय, मानोरा यांच्याकडून दि.२४.१२.२०२१ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळाला आहे. पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक महेश कुचेकर करीत आहेत.